Indian Academy of Pediatrics (IAP)

महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना ( MAHAIAP )

# पालकांसाठी मार्गदर्शक तत्वे :

प्रकरण ३१ :

## ताप आणि पुरळ

| | |
|---|---|
| अध्यक्ष २०२२ : | डॉ. हेमंत गान्गोलीया |
| सचिव २०२२-२३: | डॉ. अमोल पवार |
| मार्गदर्शक: | डॉ. जयंत उपाध्ये |
| समन्वयक: | डॉ. नरेंद्र नानिवडेकर |
| अनुवाद: | डॉ. उज्ज्वला गवळी |
| पुनरावलोकन: | डॉ. चित्रा दाभोळकर |
| | श्रीमती उज्ज्वल करमळकर |

*Convener:* **Vijay Yewale**

*Members:* **Ashwini Sood,**
**Digant D Shastri,**
**Palaniraman Ramamurthy**



**लहान मुलांमध्ये ताप आल्यावर अनेकदा अंगावर पुरळ येतात. हे वेगवेगळ्या आजारांचे लक्षण असू शकते. त्याबद्दल प्रश्नोत्तराद्वारे तज्ञ काय सांगतात हे आज आपण पाहूया.**

### वारंवार विचारले जाणारे १० प्रश्न

1. मुलांना पुरळ का येते आणि पुरळ येण्याचे प्रमाण किती सामान्य (normal) आहे?
2. माझ्या एक वर्षाच्या बाळाला तापाबरोबर अंगावर पुरळ आले आहे. मी काय करू ?
3. माझ्या बाळाला गोवर आहे हे मला कसे कळेल?
4. कांजिण्या मध्ये पुरळ कशी दिसते?
5. माझे मूल पाच वर्षाचे आहे त्याला ताप आला आहे, घसा दुखतो आहे आणि अंगावरपुरळ आलेआहे मी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा का?
6. माझ्या मैत्रिणीच्या मुलीला कोपरावर पुरळ आली होती, ती कांजिण्यासारखी दिसत होती. तिला हात- पाय- त्वचा आजार (Hand foot mouth disease) असल्याचे निदान झाले. या आजारासाठी आपण कोणती काळजी घेणे आवश्यक आहे?
7. साध्या विषाणूजन्य पुरळांसाठी मी काय करावे?
8. डॉक्टर, कांजिण्या झाल्यानंतर खाज सुटणे आणि कांजिण्यानंतर उद्भवणाऱ्या दुय्यम संसर्गाबद्दल काळजी वाटते. कृपया मला सल्ला द्या
9. मी माझ्या मुलाला अशा प्रकारचे विषाणूजन्य ताप आणि पुरळ येण्यापासून रोखू शकते का ?
10. मी माझ्या मुलाला पाळणाघरात किंवा शाळेत कधी पाठवू शकते?

**Under the Auspices of the IAP Action Plan 2020–2021**

**Piyush Gupta** IAP President 2021
**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021
**Bakul Parekh** IAP President 2020
**GV Basavaraja** IAP HSG 2020–2021
**Deepak Ugra** National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

31

# My Child has a Fever with Rash



प्रश्न १

**प्रश्न १ : मुलांना पुरळ का येते आणि ते किती नॉर्मल आहे?**

-विषाणूंमुळे होणारे पुरळ हे लहान मुलांमध्ये आणि बाळांमध्ये बऱ्याच वेळा दिसून येतात. बहुतेक विषाणूजन्य पुरळ निरुपद्रवी असतात आणि ते आपोआप जातात .तुमच्या मुलाला ताप आणि पुरळ असेल आणि पुरळ दाबल्यावर पांढरे होत नसेल किंवामूल खूप अस्वस्थ असेल तर तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

प्रश्न २

**प्रश्न २ : : माझ्या एक वर्षाच्या बाळाला तापाबरोबर अंगावर पुरळ आले आहे. मी काय करू?**

-बाळांना तापासोबत पुरळ उठणे नॉर्मल आहे .बहुतेक वेळा, ते साधे विषाणुजन्य पुरळ असतात. विषाणूंच्या संसर्गामुळे येणारे पुरळ म्हणजे छाती आणि पाठ यांच्यासारख्या शरीराच्या मोठ्या भागावर लाल किंवा गुलाबी ठिपके असतात .अनेक विषाणूजन्य पुरळ खाजत नाही. ते कोणताही त्रास न देता निघून जातात.

डॉक्टरांचा सल्ला कधी घ्यावा ?

-पुरळाबरोबर जर ताप दोन तीन दिवसांपेक्षा जास्त असेल, बाळ अस्वस्थ दिसत असेल किंवा त्याला शौचाला जास्त होत असेल तर लगेच डॉक्टरांचा सल्ला घ्या. तुमच्या बाळाला गोवर आहे असे तुम्हाला वाटत असले तर अशा वेळेला ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

प्रश्न
३

## प्रश्न ३: माझ्या बाळाला गोवर आहे हे मला कसे कळेल?

-सामान्यतः सर्व विषाणूजन्य पुरळामध्ये ताप तीव्रतेने कमी होतो किंवा ताप पूर्णपणे जातोआणि पुरळ दिसू लागते. परंतु गोवरामध्ये वाहणारे डोळे ,वाहणारे नाक आणि त्रासदायक खोकल्याबरोबर ताप वाढत जातो आणि पुरळ दोन तीन दिवसानंतर कानामागे व चेहऱ्यावर दिसू लागते . चेहेऱ्यापासून पूर्ण शरीरभर पसरत जाते .जसे जसे पुरळ उठते तसे तसे मूल अधिक आजारी दिसते आणि पुरळ संपूर्ण शरीरभर पसरते तेंव्हा ताप जातो..

प्रश्न
४

## प्रश्न ४: कांजिण्या मध्ये पुरळ कशी दिसते?

-कांजिण्याची पुरळ मुरूमासारखी किंवा कीटक चावल्यासारखी दिसते अनेक लहान लहान लाल फोड येतात. ते दोन-चार दिवसात अगदी जवळजवळ पसरू लागतात. नंतर ह्या पुरळामध्ये द्रव भरु लागतो .सुरुवातीला तो द्रवपातळ असतो. फोड फार पातळ असल्यामुळे काही वेळा ते फुटतात. उघडे पडल्यामुळे कोरडे होतात आणि त्यावर तपकिरी खपली दिसू लागते.

डॉक्टरांचा सल्ला कधी घ्यावा?

तुम्हाला निदानाबद्दल खात्री नसेल तर, ताप दोन तीन दिवसांपेक्षा जास्त दिवस राहिला तर किंवा फोड लाल झाले, फुटले, फोडांच्या आजूबाजूला शरीराची त्वचा लाल झाली तर, दुखत असेल तर आणि बाळ अधिक अस्वस्थ झाले असेल तर किंवा जास्त झोपत असेल तर डॉक्टरांना दाखवणे आवश्यक आहे.

प्रश्न
५

## प्रश्न ५ : माझे मूल पाच वर्षाचे आहे त्याला ताप आला आहे, घसा दुखतो आहे आणि अंगावर पुरळ आले आहे मी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा का ?

जर तुमच्या मुलाला ताप आला असेल, घसा दुखत असेल आणि गिळण्यास त्रास होत असेल तसेच पुरळ लाल खडबडीत आणि सँडपेपरसारखे असतील तर स्कार्लेट ताप (scarlet fever) असू शकतो. या बाबतीत डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

प्रश्न ६

**प्रश्न ६: माझ्या मित्राच्या मुलीला कोपरावर कांजण्यासारखी दिसणारी पुरळआलीअसत तिला " हात-पाय-तोंड रोग" म्हणजेच Hand-foot-mouth disease असल्याचे निदान झाले आहे?**

HFMD साठी आपण कोणती काळजी घेणे आवश्यक आहे?

- HFMDआजकाल खूप प्रमाणात आढळतो आहे .मुलाला एक दिवस ताप येतो आणि दुसऱ्या दिवशी पायाचे तळवे, हाताचे तळवे ,नितंब, तोंडाच्या आत किंवा आजूबाजूला लाल ठिपके किंवा फोड दिसू लागतात.

ताप आणि वेदना कमी करण्यासाठी फक्त पेरासिटामोल द्या .निर्जलीकरण टाळण्यासाठी पुरेसे द्रव्य द्या. आठवड्याभरात ते स्थिर होतील .

एच एफ एम डी साठी कशी काळजी घ्यावी ?

तुमच्या मुलाच्या फोडांना स्पर्श केल्यानंतर, त्याचे नाक पुसल्यानंतर किंवा त्याचा लंगोट बदलल्यानंतर किंवा शौच साफ केल्यानंतर तुमचे हात चांगले धुवा .जोपर्यंत त्याच्या फोडातील सर्व द्रव्य सुकत नाही, तोपर्यंत मुलाला शाळेत पाठवू नका किंवा इतर मुलांसोबत खेळू देऊ नका .फोडांना नैसर्गिकरित्या कोरडे होऊ द्या .त्यांना छेदू नका किंवा पिळू नका .

एच एफ एम डी हा एक विषाणूजन्य संसर्ग आहे. यात सहसा काही गंभीर गुंतागुंत होत नाही .अँटिबायोटिक्स विषाणुवर काम करीत नाही . एच एफ एम डी असलेल्या मुलांना अँटीबायोटिक्स दिली जात नाहीत. एच एफ एम डी स्वतः बरे होतील. आपण घरी आपल्या मुलाची काळजी घेऊ शकता .

प्रश्न ७

**प्रश्न ७ : साध्या विषाणूजन्य पुरळासाठी मी काय करावे ?**

तापासाठी पॅरासिटामोल द्या.

अँटिबायोटिक्स विषाणूंवर काम करीत नाहीत आणि विषाणूजन्य संसर्गामुळे पुरळ उठलेल्या मुलांना दिली जात नाहीत.

ताप असताना पुरेशी विश्रांती आणि भरपूर द्रवपदार्थ द्या, शरीरात भरपूर पाणी असले (well hydratred) तर ते मुलांना चांगले ठेवण्यास मदत करते.

## प्रश्न ८

## ८) डॉक्टर कांजिण्यांच्या आजारात खाज सुटणे आणि तसेच कांजिण्याच्या दुय्यम संसर्गाची काळजी वाटते कृपया सल्ला द्या ?

- कांजण्यांचे पुरळ आले असता खाज सुटते. कॅलामाइन लोशन लावले तर आराम मिळू शकतो. .तुमच्या मुलाला सैल, सुती कपडे घाला. अंग झाकून ठेवू नका .नखे कापा. नाहीतर तुमचा मुलगा उघड्या भागावर खाजवेल आणि त्यामुळे जंतूसंसर्ग होऊ शकेल.

## प्रश्न ९

## मी माझ्या मुलाला अशा प्रकारचे तापजन्य ,विषाणूजन्य पुरळ येण्यापासून रोखू शकतो का ?

- काही विषाणूजन्य पुरळ लसीकरणाद्वारे रोखले जाऊ शकतात परंतु सर्व विषाणूजन्य पुरळ उठणाऱ्या आजारावर लस उपलब्ध नाही.गोवर, रूबेला किंवा कांजण्या यांच्यासारखे लसीकरण असलेल्या संसर्गजन्य आजारांसाठी तुमच्या मुलाचे लसीकरण करून घ्या .स्वच्छते बाबत सतर्क राहा .आपले स्वतःचे व आपल्या मुलांचे हात वारंवार धुवा.

## प्रश्न १०

## १०) मी माझ्या मुलाला पाळणाघरात किंवा शाळेत कधी पाठवू शकतो ?

विषाणूजन्यताप आणि पुरळ येणारे आजार संसर्गजन्य असतात. त्यामुळे जर तुमच्या मुलाला असा संसर्ग झाला तर त्याला पाळणाघरात किंवा जिथे लहान मुलांची काळजी घेतली जाते अशा ठिकाणी, जिथे अनेक मुलांच्या संपर्कात येण्याची शक्यता असते (बालवाडी, अंगणवाडी इ.) तिथे पूर्ण बरे वाटेपर्यंत पाठवू नका.